सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

RNI. NO. MAHBIL /25/A0192

https://epaper.globalmahatej.com/

Postal Regd. No. JAL/443/2025-2027

वर्ष १ ले | अंक : ३४६ | मंगळवार, दि. ८ सप्टेंबर २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com



रवि ज्वेलर्स
सराफ बाजार, अमळनेर.
मो. ७०७४७४२१२१
सोने-चांदी
आजचे भाव
२४ सोने ९९.५०% : ₹ १,४९,०००
२२ सोने ९१.६०% : ₹ १,३८,५००
१८ सोने ७५.००% : ₹ १,१५,०००
शुद्ध चांदी ९९९% : ₹ २,३६०/-
भाव प्रती १० ग्राम


आजचे अभीष्टचिंतन



इंजि. सौ. निलाक्षी मुंदडा-दलिया

अमळनेर / पुणे



श्री. सुनील पाटील

पोलीस दल

## रुद्र महाभिषेकातून भक्ती आणि चैतन्याची अनुभूती

### श्री मंगळग्रह मंदिरात श्रावणानिमित्त आयोजन : बांधकाम सभापती दादा पवार सपत्नीक होते पूजेचे विशेष मानकरी

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : श्रावण मासानिमित्त दरवर्षीप्रमाणे यंदाही येथील मंगळग्रह सेवा संस्था संचलित श्री मंगळग्रह मंदिरात आज सोमवार, दि. ७ सप्टेंबर रोजी पूजेच्या मानकऱ्यांसह भाविकांनी रुद्रा महाभिषेकातून भक्ती आणि चैतन्याची अनुभूती घेतली. शहराचे नगरसेवक साहेबराव (दादा) पवार व त्यांच्या धर्मपत्नी सौ. सीमाताई पवार हे दाम्पत्य रुद्र महाभिषेक पूजेचे विशेष मानकरी होते. त्यांनी मंदिरातील श्री मंगळेश्वर महादेवांच्या पिंडीवर विधीवत रुद्र महाभिषेकासह पूजा-अर्चना व बिल्बार्चना केली. भगवान महादेवांच्या उपासनेसाठी विशेष पवित्र मानल्या जाणाऱ्या श्रावणातील या धार्मिक विधीमुळे मंदिर परिसरात चैतन्य आणि मंगलमय वातावरण निर्माण झाले होते. मंगळग्रह सेवा संस्थेचे अध्यक्ष डॉ. डिगंबर महाले यांच्या मार्गदर्शनाखाली दरवर्षी श्रावण मासानिमित्त रुद्र महाभिषेकाचे आयोजन केले जाते. यंदाही पारंपरिक धार्मिक विधींचे पालन करीत रुद्र महाभिषेक झाला. महादेवांच्या पिंडीवर जल, दुग्ध, पंचामृत आदींच्या अभिषेकासह मंत्रोच्चार करण्यात आले. यावेळी भाविकांनी भगवान महादेवांचे दर्शन घेत पूजा-अर्चा केली.

रुद्र महाभिषेकाच्या माध्यमातून शिवतत्त्वाचे स्मरण, अंतःकरणाची शुद्धी आणि आध्यात्मिक समाधान प्राप्त होते, अशी धार्मिक श्रद्धा असल्याने मंदिर परिसरात भाविकांनी गर्दी केली होती. रुद्र महाभिषेकानंतर झालेल्या भस्म महाआरतीने सोहळ्याची सांगता झाली. याप्रसंगी झालेले घंटानाद, शंखनाद आणि मंत्रोच्चारांनी मंदिर परिसर दुमदुमला. उपस्थित भाविकांनी 'ओम नमः शिवाय', 'हर हर महादेव'चा जयघोष करीत आरतीत सहभाग नोंदविला. महाआरतीवेळी संपूर्ण परिसरात भक्तीमय आणि मंगलमय वातावरण अनुभवायला मिळाले.

मंदिराचे पुरोहित शुभम वैष्णव, प्रसाद भंडारी, तुषार दीक्षित, जयेंद्र वैद्य, परशुराम शर्मा, वैभव लोकाक्षी, गणेश जोशी, मंदार कुलकर्णी, अक्षय जोशी, हेमंत गोसावी, यश जोशी यांनी रुद्र महाभिषेकाचे पौरोहित्य केले. त्यांना ढोलकीवर चंद्रकांत जोशी यांच्यासह उमेश पाठक यांनी सहकार्य केले. या धार्मिक सोहळ्यावेळी मंगळग्रह सेवा संस्थेचे उपाध्यक्ष एस. एन. पाटील, विश्वस्त अनिल अहिरराव यांच्यासह मंगल सेवेकरी, भाविक व मंदिराचे सेवेकरी मोठ्या संख्येने उपस्थिते होते.

**भस्म महाआरतीचे महत्त्व**

भस्म हे आपल्याला शिकविते की हे शरीर मातीचे (नश्वर) आहे आणि एक दिवस ते राखेमध्ये (भस्मात) बदलणार आहे. भस्म महाआरती पाहिल्याने किंवा त्यात सहभागी झाल्याने मनातील मोह, वासना आणि अहंकार नष्ट होतो. भौतिक शरीर नष्ट झाले तरी आत्मा अमर आहे, हे सत्य भस्त महाआरती अधोरेखित करते. वैराग्य आणि भक्ती हे आपल्याला सांसारिक मोहापासून दूर राहून परमेश्वराच्या भक्तीत आणि नम्रतेते जीवन जगण्याची प्रेरणा देते. भगवान शिव हे 'महाकाल' आहेत, जे काळ आणि मृत्यूच्या पलीकडे आहेत. भस्म महाआरती याची प्रचिती देते.





अमळनेर : श्रावण मासानिमित्त येथील मंगळग्रह सेवा संस्था संचलित श्री मंगळग्रह मंदिरात सोमवार, दि. ७ सप्टेंबर रोजी भक्तीमय आणि मंगलमय वातावरणात रुद्र महाभिषेक झाला. यावेळी रुद्र पूजा करताना विशेष मानकरी पालिकेचे बांधकाम सभापती साहेबराव (दादा) पवार व त्यांच्या धर्मपत्नी सौ. सीमाताई पवार. दुसऱ्या छायाचित्रात भस्म आरती करताना मंदिराचे पुरोहित..

## श्री मंगळग्रह मंदिरात आज श्री सत्यनारायण महापूजा

**अमळनेर :** श्रावण मासानिमित्त दरवर्षीप्रमाणे यंदाही येथील मंगळग्रह सेवा संस्था संचलित श्री मंगळग्रह मंदिरात मंगळवार, दि. ८ सप्टेंबर रोजी श्री सत्यनारायण महापूजा आयोजित करण्यात आली आहे. महापूजेचे विशेष मानकरी चंद्रकांत (मुन्ना) शर्मा व त्यांच्या धर्मपत्नी नगरसेविका सौ. कल्पनाताई शर्मा या दाम्पत्याच्या हस्ते सकाळी साडेआठच्या सुमारास या महापूजेची मंत्रोच्चारांसह विधीवत सुरूवात होईल.

श्रावणातील भगवान विष्णूंच्या सत्यनारायण स्वरूपाची महापूजा करणे अतिशय पवित्र व पुण्यफल प्राप्तीचे मानले जाते. या काळात वातावरण पूर्णपणे सात्त्विक असते. त्यामुळे या पवित्र महापूजेवेळी शहरासह परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने दर्शनासह तीर्थप्रसादासाठी सकाळी ९ वाजेपासून रात्री १० वाजेपर्यंत यावे, असे आवाहन मंगळग्रह सेवा संस्थेच्या विश्वस्त मंडळातर्फे करण्यात आले आहे.

### गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!!

जय भारत...!

जय स्वदेशी...!!



अमळनेर : येथील नगरसेवक विजय कहारू पाटील यांना सोमवार, दि. ७ सप्टेंबर रोजी वाढदिवसानिमित्त पुष्पगुच्छ देत शुभेच्छा देताना दै. 'ग्लोबल महातेज'चे कार्यकारी संपादक भरत पाटील, मार्केटिंग मॅनेजर शरद कुलकर्णी, मुख्य आर्टिस्ट समीर सांगळे, ज्युनिअर आर्टिस्ट विशाल पाटील, ऑपरेटर संजय सोनवणे व रेडिओ मंगलध्वनीचे समन्वयक अजय पाटील.

## मातीचा गणपती, पर्यावरणाची खरी भक्ती!

### अमळनेरमध्ये जयनिल फाऊंडेशन आयोजित शाडू माती गणपती कार्यशाळेस उत्स्फूर्त प्रतिसाद

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : येथील जयनिल फाऊंडेशनतर्फे पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचा संदेश रुजविण्यासाठी सोमवार, दि. ७ सप्टेंबर रोजी मराठा मंगल कार्यालयात भव्य तालुकास्तरीय शाडू माती गणपती कार्यशाळा व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. 'मातीचा गणपती, पर्यावरणाची खरी भक्ती' या संदेशाने झालेल्या या कार्यशाळेत विद्यार्थ्यांना शाडू मातीपासून गणरायांची मूर्ती साकारण्याचे प्रशिक्षण देण्यात आले. पीओपीमुळे होणारे जलप्रदूषण टाळून निसर्ग संवर्धनाचा संदेश देणे हा मुख्य हेतू होता. माजी मंत्री तथा आमदार अनिलदादा भाईदास पाटील

पान २ वर



अमळनेर : जयनिल फाऊंडेशनतर्फे पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचा संदेशासाठी शाडू माती गणपती कार्यशाळा स्पर्धेतील बक्षीसपात्र स्पर्धकांसमवेत आमदार अनिलदादा पाटील व जयनील फाऊंडेशनचे अध्यक्ष गौतम पाटील, उपाध्यक्ष वरुण पाटील व राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी.


अभीष्टचिंतन

स्नेह, आदर आणि आपुलकीचा संगम...

इंजि. निलाक्षी मुंदडा (दलिया)

यांना वाढदिवसाच्या

अनंत शुभेच्छा!

शिक्षणाचा मार्ग असो वा समाजकारणाचा, प्रत्येक क्षेत्रात आपल्या ज्ञानाचा व कौशल्याचा ठसा उमटवणारे नेतृत्व!



आपणांस वाढदिवसाच्या

हार्दिक शुभेच्छा

शुभेच्छुक

मुंदडा फाउंडेशन संचलित

श्री एन टी मुंदडा ग्लोबल व्ह्यू स्कूल

श्री एन टी मुंदडा विद्या मंदिर

श्री एन टी मुंदडा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय

स्वर्गीय सौ पद्मावती नारायणदास मुंदडा माध्यमिक विद्यालय

श्री मधुसूदन सुरजमल मुंदडा माध्यमिक विद्यालय

स्व. पं. श्रीमती इंदिरा गांधी विद्यामंदिर

सर्व संचालक मंडळ, सर्व मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वृंद.

ओमप्रकाश मुंदडा, नरेंद्र मुंदडा, योगेश मुंदडा, राकेश मुंदडा, पंकज मुंदडा, अभिनय मुंदडा, अमेय मुंदडा, शुभम मुंदडा, चिराग मुंदडा, गौतम मुंदडा, वरद मुंदडा

MUNDADA BUILDERS AND DEVELOPERS

Office- Shri N. T. Mundada Park, Amalner Dist. Jalgaon

Amey Mundada- 8600505545 | Shubham Mundada- 8806092929

MUNDADA BUILDERS AND DEVELOPERS INNOVATION|TRUST|QUALITY ~SINCE 1989~


## श्री मंगळग्रह मंदिरात उद्यापासून 'महारुद्र'चा मंगलमय जागर

### डॉ. डिगंबर महाले व सौ. आशाताई महाले यांच्या शुभ हस्ते तीन दिवसीय महारुद्र पूजा

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : येथील मंगळग्रह सेवा संस्था संचलित श्री मंगळग्रह मंदिराते बुधवार, दि. ९ ते ११ सप्टेंबर २०२६ दरम्यान महारुद्र पूजेचे आयोजन करण्यात आले आहे. मंगळग्रह सेवा संस्थेचे अध्यक्ष डॉ. डिगंबर महाले व त्यांच्या धर्मपत्नी सौ. आशाताई महाले यांच्या शुभ हस्ते या धार्मिक अनुष्ठानास प्रारंभ होणार आहे. या




निमित्ताने मंदिर परिसरात भक्तीमय आणि आध्यात्मिक वातावरण निर्माण होणार असून, भाविकांनी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन मंगळग्रह सेवा संस्थेच्या विश्वस्त मंडळाने केले आहे.

शैव परंपरेमध्ये भगवान शिव यांची उपासना ही अंतःकरणशुद्धी, पान २ वर

**तीन दिवस मंदिर परिसरात भक्तीमय वातावरण**

या तीन दिवसीय महारुद्र पूजेच्या निमित्ताने मंदिरात विविध धार्मिक विधी, मंत्रपठण व अभिषेकाचे आयोजन करण्यात आले आहे. शिवभक्तांनी या आध्यात्मिक पर्वात सहभागी होऊन भगवान महादेवांचे दर्शन व पूजेचा लाभ घ्यावा, असे आवाहन मंगळग्रह सेवा संस्थेतर्फे करण्यात आले आहे. 'हर हर महादेव'च्या जयघोषात तीन दिवस चालणाऱ्या या महारुद्र पूजेमुळे श्री मंगळग्रह मंदिर परिसर शिवभक्तीच्या चैतन्याने भारावून जाणार असून, श्रद्धा आणि अध्यात्माचा हा मंगल सोहळा भाविकांसाठी विशेष पर्वणी ठरणार आहे.

## संपादकीय



# आव्हानांतील अर्थबहर

नव्या आर्थिक वर्षातील पहिल्याच तिमाहीत एकूण देशांतर्गत उत्पादनाने (जीडीपी) नोंदवलेली ७.८ टक्के वाढ ही अर्थव्यवस्थेतील स्थैर्याची हमी आहे. विशेषतः पश्चिम आशियातील युद्धजन्य स्थिती, इंधनाचा तुटवडा-दरवाढ आणि पुरवठा साखळीतील अडचणी आदींमुळे अनेक देशांच्या अर्थव्यवस्था हेलकावे खात असताना भारताने रिझर्व्ह बँक आणि अर्थतज्ज्ञांच्या अंदाजाहून अधिक वेगाने वाढ नोंदवली, हा सुखद संकेतच. देशांतर्गत मागणी आणि नागरिकांनी मोठ्या प्रमाणात केलेले खर्च, सरकारी गुंतवणुकीचा कायम राहिलेला ओघ आणि धोरणात्मक लवचिकता यांना त्याचे श्रेय जाते. पुढील तिमाहीतही सणावारांच्या खरेदीचा अर्थव्यवस्थेला आधार मिळण्याचा अंदाज आहे. मात्र, मॉन्सूनच्या कमी-अधिक प्रमाणाचा अन्नधान्य उत्पादन, पर्यायाने ग्रामीण अर्थव्यवस्था व महागाईवर काय परिणाम होणार, यावर लक्ष ठेवावे लागेल. इराण-अमेरिका युद्ध आणि इंधनटंचाई सुरू झाल्यानंतर प्रारंभी जाणवलेला इंधन व गॅसचा तुटवडा वगळता भारताला या युद्धाच्या तीव्र झळा लागलेल्या दिसत नाहीत, असे यातून ढोबळमानाने म्हणता येते. या काळात सेवा क्षेत्राने अपेक्षेप्रमाणे १० टक्के वाढ दर्शवून यात भरीव वाटा उचलला आहे. त्यामध्ये बँकिंग, विमा, वित्त-गुंतवणूक, माहिती तंत्रज्ञान, व्यापार, हॉटेल आणि पर्यटन-वाहतूक यांची कामगिरी चांगली राहिली. उत्पादन क्षेत्राचीही वाढ ७.७ टक्के आहे. मात्र, शेती क्षेत्राच्या वाढीचा वेग केवळ ३.६ असून गेल्या वर्षी याच तिमाहीतील ४.४ च्या तुलनेत तो निराशाजनक म्हणावा लागेल.

विशेषतः गव्हाच्या उत्पादनात केवळ अर्ध्या टक्क्याने झालेली वाढ चिंतेचा विषय ठरू शकते. या तिमाहीत 'रिअल जीडीपी' ८१.३६ लाख कोटी रुपये होता. अर्थतज्ज्ञांचे अंदाज ७ टक्क्यांचे असताना त्याहून झालेली वाढ अर्थव्यवस्थेतील स्थैर्य आणि विश्वासाचेही निदर्शक आहे. जीडीपीसह वस्तू व सेवाकराच्या (जीएसटी) संकलनातील १५ टक्के वाढही समाधानकारक आहे. सेवा आणि उत्पादन क्षेत्रातील वाढीमुळे भविष्यात रोजगारसंधी निर्माण होऊ शकतात, तर दुसरीकडे शेतीक्षेत्राची मंद वाढ, महागाई आणि युद्धस्थितीचा अर्थव्यवस्थेवर ताण येऊ शकतो, असे हे दुहेरी चित्र म्हणता येईल. 'कोरोना'च्या साथीनंतर अनेक देशांच्या अर्थव्यवस्था उद्‌ध्वस्त झाल्या. भारतावरही त्याचे परिणाम झाले असले, तरी तुलनेने आपली अर्थव्यवस्था लवकर सावरली. मात्र, त्यानंतरही विविध तणावांमुळे जगभरात मंदीचे सावट आहे. त्या पार्श्वभूमीवर पहिल्या तिमाहीतील या कामगिरीबाबत पंतप्रधान नरेंद्र मोदी, अर्थमंत्री सीतारामण यांच्यासह सरकारच्या वतीने समाधान व्यक्त करून विरोधकांवर टीकास्त्र सोडण्यात आले आहे. दुसरीकडे विरोधक 'हा विकास असेल, तर महागाई, बेरोजगारी आणि विषमता इतकी टोकाला का गेली आहे,' असा सवाल विचारत आहेत. टीकाकारांच्या मते हे आकडे भांडवली गुंतवणूक, तंत्रज्ञान उद्योगांचा नफा आणि उच्च व उच्च मध्यमवर्गाच्या उत्पन्न-खर्चामध्ये फिरणारे आहेत. या राजकीय भूमिकांच्या पलीकडे जाऊन पाहिले, तरी या आर्थिक विकासाचे लाभ तळागाळापर्यंत पोहोचवणे, हे आव्हान निरंतर राहणारे आहे, याविषयी दुमत नसावे.

गेल्या काही दिवसांमध्ये दूध, साखरेसह विविध जीवनावश्यक वस्तूंच्या महागाईत वाढ होत आहे; त्या पार्श्वभूमीवर व्याजदरांमध्ये वाढीचा निर्णय झाला, तर त्याचा विकासदरावर परिणाम होण्याची भीती आहे. त्याशिवाय पश्चिम आशियातील तणाव अद्याप पूर्णपणे संपलेला नाही. भविष्यात इंधनाचा तुटवडा कायम राहिल्यास इंधनाची दरवाढ, वाहतूक खर्चातही वाढ आणि महागाईत भर किंवा सरकारवर अनुदानाचा मोठा बोजा पडू शकतो. रुपयाची घसरण सुरूच असून, निर्यातीमध्येसुद्धा फारशी आशादायक कामगिरी नाही. नजिकच्या काळातही जगभरातील स्थिती सुधारण्याची शक्यता धूसर असल्याने देशांतर्गत मागणीवर विसंबून राहावे लागणार आहे. त्यासाठी दरडोई उत्पन्न वाढून बाजारपेठ विस्तारणे आणि मागणीत वाढ महत्त्वाची ठरेल. कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे (एआय) माहिती तंत्रज्ञान क्षेत्रावर कर्मचारी कपातीचे ढग घोंगावत असून सेवा क्षेत्राची कामगिरी टिकवण्याचे मोठे आव्हान असेल. त्याबरोबरच पायाभूत सुविधांमध्ये होणारी गुंतवणूक प्रामुख्याने सरकारी आहे. भविष्यकाळात खासगी गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी अथक प्रयत्न करण्याचा संदेशही या आकड्यांनी दिला आहे.

# अमळनेर तालुका दुष्काळी जाहीर करा

## क्रांतिकारी शेतकरी संघटनेची मागणी; प्रांताधिकारी, तहसीलदारांना निवेदन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : अमळनेरसह तालुक्यात दि. ३१ जुलै २०२६ रोजी मोठ्या प्रमाणावर अतिवृष्टी झाली. तसेच बोरी नदीला आलेल्या पुरामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. या पार्श्वभूमीवर अमळनेर तालुका दुष्काळग्रस्त म्हणून जाहीर करावा. तसेच पीक विमाही देण्यात यावा, अशी मागणी क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे संस्थापक व महाराष्ट्र अध्यक्ष रविकांत तुपकर यांच्या मार्गदर्शनाखाली व जळगाव जिल्हाध्यक्ष शरद पाटील यांच्या नेतृत्वाखाली संघटनेच्या येथील शाखेतर्फे करण्यात आली. प्रांताधिकारी मयूर भंगाळे व तहसीलदार डॉ. उमाताई ढेकळे यांना यासंदर्भात नुकतेच निवेदन देण्यात आले.



*अमळनेर : अमळनेर तालुका दुष्काळग्रस्त म्हणून जाहीर करावा. तसेच पीक विमाही देण्यात यावा, या मागणीचे निवदेन तहसीलदार डॉ. उमाताई ढेकळे यांना देताना जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश बोरसे, तालुकाध्यक्ष संदीप सैंदाणे, तालुका उपाध्यक्ष अमजदखाँ पठाण, तालुका सरचिटणीस भूषण कोळी आदी.*

निवेदनात म्हटले आहे, की ३१ जुलैला झालेल्या अतिवृष्टीमुळे तथा बोरी नदीला आलेल्या महापुरामुळे शेतकऱ्यांच्या शेतामध्ये पाणी साचले असल्यामुळे पिकांचे नुकसान झालेले आहे. सरसकट पंचनामा न करता प्रशासनाने तोडगा, अर्धा-अपुरा पंचनामा केला. त्यामुळे अनेक शेतकऱ्यांवर अन्याय झाला, असे प्रथमदर्शी दिसते. तदनंतर एक ऑगस्टपासून पावसाने दडी मारल्यामुळे होती नव्हती ती पिके ऊन धरू लागली आहेत, आणि ती हातातून जाण्याची भीती निर्माण झाली आहे. त्यामुळे शेतकरी हवालदिल झाला आहे. प्रशासनाने त्वरित अमळनेर तालुका पैसेवारी काढून दुष्काळ जाहीर करावा, अशी मागणी जोर धरू लागली आहे. शेतकऱ्यांच्या मदतीसाठी प्रशासनाने सरसकट मदत करावी. तसेच पीक विमाबद्दल सरकारचे धोरण स्पष्ट जाहीर करून पीक विम्याचे स्टीक १ ते ४ कमी केल्या आहेत. ते आपण आपल्या स्तरावरून वरिष्ठांना कळवावे. निवेदनावर जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश बोरसे, तालुकाध्यक्ष संदीप सैंदाणे, तालुका उपाध्यक्ष अमजदखाँ पठाण, तालुका सरचिटणीस भूषण कोळी आदींच्या सह्या आहेत.

# मातीचा गणपती, पर्यावरणाची खरी भक्ती!

**पान १ वरून** यांच्या हस्ते या उपक्रमाचे उद्‌घाटन झाले. विद्यार्थ्यांशी गप्पा मारत त्यांनी संपूर्ण वेळ उपस्थित राहून विद्यार्थ्यांचा उत्साह वाढविला. 'विद्यार्थ्यांच्या या उत्साहाने माझ्या बालपणीच्या आठवणींना उजाळा मिळाला,' अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

अशी मिळाली बक्षिसे

**बाल गट :** प्रथम : लावण्या काशिनाथ पाटील, दितीय : श्रद्धा रवींद्र कदम, तृतीय : जीविका राजेंद्र पाटील, चौथा : आर्या जितेश पाटील, पाचवा : कृतिका वैभव पवार. **मोठा गट :** प्रथम : जयेश धनंजय हडप, द्वितीय : हर्षवर्धन महेंद्र वाघ, तृतीय : अनुष्का एकनाथ पाटील, चौथा : कृतिका समाधान पारधी, पाचवा : जानवी रवींद्र पाटील. **बाल गट** (१ ली ते ७ वी) व खुला गट अशा दोन गटांत स्पर्धा झाली. दोन्ही गटांत प्रथम : ३०००/- रुपये, द्वितीय : २०००/-, तर तृतीय : १०००/- रुपये अशी बक्षिसे व सर्व सहभागींना प्रशस्तीपत्र देण्यात आले. हा उपक्रम जयनिल फाऊंडेशनचे अध्यक्ष गौतम अनिल पाटील व उपाध्यक्ष वरुण राजेश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली झाला. यावेळी शहर विकास आघाडीच्या गटनेत्या सौ. जयश्रीताई पाटील, सरपंच श्रीमती राजश्रीताई पाटील, संजय पुनाजी पाटील, पत्रकार संघाचे अध्यक्ष चेतन राजपूत, जितेंद्र ठाकूर, किरण पाटील, पांडुरंग पाटील, विनोद कदम, राजेश पाटील, महेश पाटील, डॉ. बाविस्कर दाम्पत्य, गणेश भामरे, भूषण भदाणे, शेलकर सर, दुर्गेश पाटील, सामाजिक क्षेत्रातील पदाधिकारी व जयनिल फाऊंडेशनची टीम उपस्थित होती.

# आदर्श मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा गौरव

## अमळनेरमध्ये माजी केंद्रीय मंत्री विजय नवल पाटील यांच्या ८४ व्या वाढदिवसानिमित्त कार्यक्रम



*अमळनेर : माजी केंद्रीय मंत्री विजय नवल पाटील यांच्या ८४ व्या वाढदिवसानिमित्त आयोजित आदर्श मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी सन्मान सोहळ्यास उपस्थित पुरस्कारार्थींसमवेत माजी आमदार डॉ. सुधीर तांबे, माजी आमदार दिलीप सोनवणे, स. ध. भावसार व संस्थेचे पदाधिकारी.*

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : माजी केंद्रीय मंत्री तथा नवलभाऊ प्रतिष्ठानचे अध्यक्ष विजय नवल पाटील यांच्या ८४ व्या वाढदिवसानिमित्त येथील विजयनाना पाटील आर्मी स्कूलमध्ये शनिवार, दि. ५ सप्टेंबर रोजी आदर्श मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी सन्मान सोहळा झाला. ग्रामविकास मंडळ, नवलनगर या संस्थेच्या सुवर्ण महोत्सवांतर्गत हा कार्यक्रम घेण्यात आला.

माजी आमदार डॉ. सुधीर तांबे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कारप्राप्त स. ध. भावसार, माजी आमदार दिलीप सोनवणे, गांधलीचे सरपंच नरेंद्र पाटील, प्रा. गणेश पवार, प्रशासकीय अधिकारी डी. बी. पाटील, संस्थेचे मानद शिक्षण संचालक प्रा. सुनील गरुड, प्रशासकीय अधिकारी प्रा. श्याम पवार, सुवर्ण महोत्सव समितीचे अध्यक्ष डी. के. पवार, प्रशासकीय अधिकारी एस. यू. पाटील, सहाय्यक प्रशासकीय अधिकारी आर. एन. भालेराव, प्राचार्य डॉ. एस. जे. शेख, प्राचार्य विजय उभाडे, आर्मी स्कूलचे प्राचार्य बी. डी. पाटील, प्रा. के. वाय. देवरे आदी प्रमुख अतिथी होते.

सुरूवातीला आर्मी स्कूलच्या छोट्या जवानांनी पथसंचलनाद्वारे मान्यवरांना मानवंदना दिली. यावेळी माजी आमदार डॉ. तांबे यांना विशेष मानपत्र देऊन संस्थेतर्फे सन्मानित करण्यात आले. यावेळी श्री. भावसार, दिलीप सोनवणे, श्री. पवार, सौ. अलकनंदाताई पाटील, सौ. जयश्रीताई पवार आदींनी मनोगत व्यक्त केले.

प्रा. गरुड यांनी प्रास्ताविक केले. उपप्राचार्य प्रा. डॉ. गांगुर्डे यांनी मानपत्राचे वाचन केले. यावेळी ग्रामविकास मंडळ, नवलभाऊ प्रतिष्ठान, रुख्मिणीताई प्रतिष्ठान, मुंबईचे सर्व प्राचार्य, मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. उमेश काटे यांनी सूत्रसंचालन केले. शरद पाटील यांनी आभार मानले.

**सन्मानित आदर्श मुख्याध्यापक, शिक्षक व कर्मचारी**

माजी केंद्रीय मंत्री विजय नवल पाटील यांच्या ८४ व्या वाढदिवसानिमित्त १४ जणांचा सत्कार करण्यात आला. यात उत्कृष्ट प्राचार्य म्हणून किरण बाविस्कर (प्राचार्य- आय. टी. आय, अमळनेर), आदर्श मुख्याध्यापक म्हणून सौ. अलकनंदाताई कैलास पाटील (इंदिरा गांधी कन्या विद्यालय, नवलनगर, ता. धुळे ), बी. डी. पाटील (आर्मी स्कूल, अमळनेर), आदर्श शिक्षक म्हणून योगेश जाधव (उदयनगर, ता. अमळनेर ), सजन अहिरे (चिंचखेडा. ता. धुळे), एन. वाय. पाटील (गौरीशंकर माध्यमिक विद्यालय, रवंजे, ता. एरंडोल), टी. के. पावरा (आर्मी स्कूल, अमळनेर), ए. टी. पाटील (माध्यमिक विद्यालय, माळशेवगे, ता चाळीसगाव ), जयश्री पवार (विजय आर्मी स्कूल, पनवेल), मुनीर तडवी (रुक्मिणीबाई माध्यमिक विद्यालय, वेले, ता. चोपडा), सौ. संगीताताई महाले ( साने गुरुजी प्राथमिक विद्यालय, चाळीसगाव), आदर्श कर्मचारी म्हणून सुनील रामरतन पाटील, (गौरीशंकर माध्यमिक विद्यालय, रवंजे, ता. एरंडोल), अनिल पाटील (रुक्मिणीबाई माध्यमिक विद्यालय, वेले, ता. चोपडा), हिम्मत पाटील (सिद्धेश्वर माध्यमिक विद्यालय, पिंपळकोठा, ता. एरंडोल.)

> शिक्षकच खऱ्या अर्थाने सकारात्मक परिवर्तन करू शकतात. त्यासाठी शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कार्यतत्पर राहिले पाहिजे. डॉ. कलाम, डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्यासारख्या विचारवंतांच्या वैचारिक देशांमध्ये विकृतीचे पीक जास्त प्रमाणात फोफावत आहे. त्याच्यावर फवारणी करण्यासाठी शिक्षक वृंदांनीच पुढाकार घेतला पाहिजे.
> **- डॉ. सुधीर तांबे, माजी आमदार**

> 'आदर्श शिक्षकांचा सन्मान सोहळा' हा उपक्रम कौतुकास्पद आहे. सद्यःस्थितीत शिक्षकांवर शिक्षणबाह्य कामांचे ओझे वाढले आहे. अशा विदारक परिस्थितीत विद्यार्थी, पालक व शिक्षकांनी निराशा झटकून कार्य करणे गरजेचे आहे. तरच शैक्षणिक प्रगती साधली जाईल.
> **- दिलीप सोनवणे, माजी आमदार**

> आदर्श शिक्षकांचा माझ्या हस्ते सन्मान होणे, हा माझ्यासाठी अभिमानास्पद क्षण आहे. मूल्य शिक्षण काळाची गरज आहे, शिस्त ही जीवनाची भिस्त आहे. त्यासाठी प्रत्येक गोष्ट आर्थिक नियोजनाने, बौद्धिक नियोजनाने व विवेकशील विचाराने केले जावेत. सकारात्मक विचारांनीच माणूस समृद्ध होतो.
> **- स. ध. भावसार, राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कारप्राप्त**

# 'फार्मसी'तील विद्यार्थ्यांच्या रोल-प्लेने जिंकली मने

## केले फार्मसी महाविद्यालयात शिक्षक दिनानिमित्त कार्यक्रम

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील खानदेश शिक्षण मंडळ संचलित स्व. पंढरीनाथ छगनशेठ भांडारकर कॉलेज ऑफ डी. फार्मसी आणि स्व. प्रा. र. का. केले कॉलेज ऑफ बी. फार्मसी महाविद्यालयात शनिवार, दि. ५ सप्टेंबर रोजी शिक्षक दिन मोठ्या उत्साहात आणि आनंददायी वातावरणात साजरा करण्यात आला. यानिमित्ताने महाविद्यालयातील अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांनी शिक्षकांची भूमिका (रोल-प्ले) साकारून संपूर्ण दिवसाचे कामकाज अत्यंत यशस्वीपणे सांभाळले.

सुरूवातीला डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन व अभिवादन समन्वयक प्रा. डॉ. एम. एस. वाघ व प्र.-प्राचार्य प्रा. प्रीतम पाटील यांनी केले. यानंतर अंतिम वर्षाचा विद्यार्थी तन्मय राकेश पाटील याने प्राचार्य पदाची सूत्रे हाती घेत उत्कृष्ट नियोजन केले. गीता पाटील, मयुरी पाटील, प्रियंका सैंदाणे, तन्मय पाटील, श्वेता पाटील, श्रावणी महाजन, शीतल पाटील, साक्षी पाटील आणि उदय पाटील या विद्यार्थ्यांनी प्राध्यापकांची भूमिका साकारून वर्ग नियंत्रणासोबतच तासिकेचे कामकाज पाहिले.

द्वितीय वर्ष बी. फार्मसीच्या विद्यार्थ्यांनी आपल्या भाषणांतून शिक्षकांप्रती आदर व कृतज्ञता व्यक्त केली. यामध्ये अदिती गोहोर, भाग्यश्री मंडोले, चैताली बोरसे, लक्ष्मी महाजन आणि मोहन पाटील यांनी शिक्षकांचे वैद्यकीय शिक्षण क्षेत्रातील योगदान आणि विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील महत्त्व यावर प्रभावी विचार मांडले.

अंतिम वर्षाच्या साक्षी पाटील, गीता पाटील, प्रियंका सैंदाणे आणि रोशनी महाजन यांनी आपल्या ओघवत्या शैलीत सूत्रसंचालन केले. डिप्लोमा अंतिम वर्षाची विद्यार्थिनी कल्याणी पाटील हिने उपस्थितांचे आभार मानले.

फार्मसी महाविद्यालयाचे चेअरमन योगेश मुंदडे, समन्वयक प्रा. डॉ. वाघ आणि सर्व प्राध्यापक आणि प्राध्यापकेतर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांच्या या उपक्रमाचे कौतुक करून त्यांना पुढील भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.



*अमळनेर : येथील खानदेश शिक्षण मंडळ संचलित स्व. पंढरीनाथ छगनशेठ भांडारकर कॉलेज ऑफ डी. फार्मसी आणि स्व. प्रा. र. का. केले कॉलेज ऑफ बी. फार्मसी महाविद्यालयात शनिवार, दि. ५ सप्टेंबर रोजी शिक्षक दिन मोठ्या उत्साहात साजरा झाला. यावेळी डिप्लोमा व बी. फार्मसीच्या विद्यार्थी-विद्यार्थिनींसमवेत समन्वयक प्रा. डॉ. एम. एस. वाघ, प्र.-प्राचार्य प्रा. प्रीतम पाटील, सर्व प्राध्यापक आणि प्राध्यापकेतर कर्मचारी.*

# 'महारुद्र'चा मंगलमय जागर

**पान १ वरून :** मानसिक स्थैर्य आणि आध्यात्मिक उन्नतीचा मार्ग मानली जाते. त्यात महारुद्र पूजा ही विशेष महत्त्वाची आणि प्रभावी शिवोपासना मानली जाते. रुद्राध्याय, मंत्रोच्चार, अभिषेक आणि विविध वैदिक विधींच्या माध्यमातून भगवान रुद्र यांची आराधना करण्यात येते. शिवतत्त्वाशी मन एकरूप करून सकारात्मक ऊर्जा, सात्त्विकता आणि आत्मिक समाधान प्राप्त करण्याच्या भावनेतून ही पूजा केली जाते.

**रुद्राभिषेकातून शिवतत्त्वाचे चिंतन**

महारुद्र पूजेदरम्यान भगवान शिव यांच्या पिंडीवर विविध द्रवांनी अभिषेक केला जातो. वेदांमधील श्रीरुद्र मंत्रांचे पठण, वैदिक मंत्रोच्चार आणि भक्तिभावाने केलेली उपासना यामुळे वातावरणात आध्यात्मिक स्पंदने निर्माण होतात, अशी श्रद्धा आहे. 'रुद्र' हे भगवान शिव यांचे तेजस्वी आणि परिवर्तनकारी रूप मानले जाते. जीवनातील नकारात्मकता दूर करून अंतर्मनात शांतता, संयम आणि सद्‌भावना निर्माण करण्याचा संदेश या उपासनेतून दिला जातो.

**महारुद्र पूजेची आध्यात्मिक फलश्रुती**

धार्मिक श्रद्धेनुसार महारुद्र पूजेच्या माध्यमातून मनःशांती, आरोग्य, सुख-समृद्धी, कुटुंबातील सौख्य आणि जीवनातील अडथळे दूर होण्यासाठी शिवकृपा प्राप्त होते, अशी भाविकांची भावना आहे. संकटसमयी मानसिक बळ मिळावे, नकारात्मक विचार दूर व्हावेत आणि जीवनात सकारात्मकता व सात्त्विक विचारांची वृद्धी व्हावी, या हेतूने अनेक भाविक रुद्राभिषेक व महारुद्र पूजेचे अनुष्ठान करतात. शिवोपासनेची फलश्रुती केवळ भौतिक इच्छांच्या पूर्ततेपुरती मर्यादित नसून आत्मशुद्धी, मनाची एकाग्रता, अहंकाराचा क्षय आणि ईश्वराशी असलेले नाते अधिक दृढ होणे हा तिचा व्यापक आध्यात्मिक अर्थ मानला जातो. त्यामुळे महारुद्र पूजा ही भक्ती, श्रद्धा आणि आत्मचिंतन यांचा सुंदर संगम ठरते.





*अमळनेर : शिक्षक दिनाचे औचित्य साधून येथील सुपरिचित 'रवि ज्वेलर्स' यांच्या वतीने शहरातील ग. स. हायस्कूल आणि डी. आर. कन्या शाळेतील शिक्षक व कर्मचारी वृंदांचा अनोख्या पद्धतीने गौरव करताना संचालक रवि वर्मा व निखील वर्मा.*

# दागिने घडविणाऱ्यांकडून भविष्य घडविणाऱ्या हातांचा सन्मान!

## रवि ज्वेलर्सतर्फे शिक्षक दिनानिमित्त शिक्षक व कर्मचाऱ्यांचा अनोखा गौरव

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : शिक्षक दिनाचे औचित्य साधून येथील सुपरिचित 'रवि ज्वेलर्स' यांच्या वतीने शहरातील विविध शाळांमधील शिक्षक व कर्मचारी वृंदांचा अनोख्या पद्धतीने गौरव करण्यात आला. शिक्षकांच्या हातातील पेन हे विद्यार्थ्यांचे भविष्य घडविणारे प्रभावी माध्यम आहे, या संकल्पनेतून हा उपक्रम राबविण्यात आला.

प्रताप ज्युनिअर कॉलेज, साने गुरुजी प्राथमिक व माध्यमिक विद्यालय, ग. स. हायस्कूल, डी. आर. कन्या शाळा, पी.बी.ए. इंग्लिश मीडियम स्कूल, श्री एन. टी. मुंदडा ग्लोबल स्कूल तसेच सेंट मेरी स्कूल-मंगरूळ आदी शैक्षणिक संस्थांमधील शिक्षक व कर्मचाऱ्यांचा यावेळी गौरव करण्यात आला. शिक्षकांना पेन, मनापासून लिहिलेले शुभेच्छापत्र तसेच सन्मानपत्र देऊन त्यांच्या कार्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. अक्षरांपासून ज्ञान, ज्ञानापासून संस्कार आणि संस्कारातून विद्यार्थ्यांचे उज्ज्वल भविष्य घडविण्याचे कार्य शिक्षक करीत असतात. त्यामुळे त्यांच्या योगदानाला सलाम करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम आयोजित करण्यात आल्याचे रवि वर्मा व निखील वर्मा यांनी सांगितले.

'आम्ही दागिने घडवतो; मात्र भविष्य घडविणाऱ्या हातांचा सन्मान करणे ही आमची मनापासूनची भावना आहे,' अशी भावना त्यांनी व्यक्त केली. शिक्षकांच्या कार्याचा गौरव करणाऱ्या या आगळ्यावेगळ्या उपक्रमाचे शिक्षक, कर्मचारी तसेच नागरिकांकडून कौतुक करण्यात आले

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com



# आयआयटी से यूपीएससी तक का सफर

## जाने कौन है ऑल इंडिया १६ वीं रैंक हासिल करने वाली आयएएस मोनिका श्रीवास्तव ?



**सक्सेस स्टोरी**

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

जो मेहनत करना जानते है वो एक न एक दिन इतिहास रचते है जिनकी आज हम बात करने वाले है।

कहते है की मेहनत करने वालों की कभी भी हार नहीं होती है, सफलता उन्ही के कदम चूमती है जो दिन रात अपनी मेहनत और लग्न नहीं छोड़ते है। यूपीएससी सिविल सेवा परीक्षा देश की सबसे कठिन प्रतियोगी परीक्षाओं में से एक है, जिसे पास करना हर किसी की बस में नहीं होता है लेकिन उन्हीं में से एक हैं बिहार की रहने वाली मोनिका श्रीवास्तव, जिन्होंने न सिर्फ यूपीएससी परीक्षा पास की बल्कि ऑल इंडिया १६ वीं रैंक हासिल की और आयएएस अधिकारी बन गईं।

मिली जानकारी के अनुसार मोनिका श्रीवास्तव बिहार के औरंगाबाद जिले की मूल निवासी हैं, जहां वो सत्येंद्र नगर में पली-बढ़ी हैं। उनके पिता बी. के. श्रीवास्तव जिला परिषद में असिस्टेंट इंजीनियर के पद पर कार्यरत हैं, जबकि उनकी मां भारती श्रीवास्तव हाउसवाइफ हैं।

मोनिका की स्कूली शिक्षा की बात करें तो उन्होंने अपनी शुरुआती पढ़ाई सरस्वती शिशु मंदिर से और माध्यमिक शिक्षा डीएव्ही पब्लिक स्कूल से पूरी की थी। वह बचपन से ही एक मेधावी छात्रा रही हैं। अपनी स्कूली पढ़ाई पूरी करने के बाद मोनिका ने आयआयटी प्रवेश परीक्षा पास की और गुवाहाटी के प्रतिष्ठित भारतीय प्रौद्योगिकी संस्थान यानी आयआयटी में एडमिशन लिया।

मोनिका ने आयआयटी गुवाहाटी से कंप्यूटर साइंस इंजीनियरिंग की डिग्री पूरी की इसके बाद उन्हे एक मल्टीनेशनल कंपनी में नौकरी मिल गई। लेकिन उन्होंने कॉर्पोरेट करियर को छोड़ दिया, ताकि यूपीएससी की तैयारी कर सकें।

मोनिका ने महीनों तक पूरी मेहनत और लगन से तैयारी की और आखिरकार साल २०२२ में अपने पहले ही प्रयास में बीपीएससी सिविल सेवा परीक्षा में शानदार छठी रैंक हासिल की। वह इस परीक्षा में महिला टॉपर रहीं।

### दो बार पास की परीक्षा

यूपीएससी में टॉप करने के बावजूद उन्होंने सिविल सेवा की तैयारी नहीं छोड़ी। वह रोज ७ से ८ घंटे की पढ़ाई करती थीं और साल २०२४ में उन्होंने यूपीएससी परीक्षा दी और पहले ही प्रयास में ४५५ वीं रैंक हासिल की, जिसके बाद उन्होंने भारतीय रेलवे सेवा के अंतर्गत अधिकारी के रूप में प्रशिक्षण प्राप्त किया। फिर साल २०२५ में उन्होंने दोबारा यूपीएससी परीक्षा दी और इस बार शानदार १६ वीं रैंक हासिल कर आयएएस अधिकारी बन गईं।



# केस काळे आणि मजबूत करण्याचे उपाय

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

दाट, मुलायम केस असावेत, असे प्रत्येकाला वाटते. मात्र वेळेपूर्वी केस पांढरे झाले तर चिंता वाढते. आजकाल कमी वयातच केस पांढरे होण्याचे प्रमाण वाढले आहे. त्यावर आपण निरनिराळे उपाय करु लागतो. खरंतर मेलेनिन पिग्मेंटेशनच्या कमतरतेमुळे केसांचा रंग पांढरा होऊ लागतो. त्याच बरोबर धूळ, प्रदूषण इत्यादी कारणांमुळे केसांचे पोषकतत्त्व कमी होऊ लागते. याव्यतिरिक्तही तणाव किंवा अनुवंशिक आजारांमुळे केस पांढरे होऊ लागतात. यावर काही उपाय आहेत, त्यामुळे केस पुन्हा काळे होण्यास मदत होईल.

**पेरूची पाने :** पेरुची पाने वाटून त्याची पेस्ट करा. ही पेस्ट केसांना लावल्याने केस काळे होण्यास मदत होते. पेरुच्या पानात व्हिटॅमिन बी, सी असते. त्यामुळे केसगळती रोखण्यास आणि पुन्हा उगवण्यास मदत होते.

**कडीपत्ता :** कडीपत्ता फक्त पदार्थाचा स्वाद वाढवत नाही तर त्यात अनेक आरोग्यदायी गुणधर्म आहेत. कडीपत्ता खोबरेल तेलात घालून रोज त्या तेलाने केसांना मसाज करा. रात्रभर ठेवा आणि दुसऱ्या दिवशी शॅम्पूने केस धुवा. असे नियमित केल्यास लवकरच परिणाम दिसू लागेल.

**खोबरेल तेल :** खोबरेल तेलात लिंबाचा रस घाला. त्याने डोक्याला हलक्या हाताने मालिश करा. त्यामुळे केस काळे आणि चमकदार होतील.

**कांद्याचा रस :** कांद्यात सल्फर असते ज्यामुळे केस काळे होण्यास मदत होते. यामुळे २, ३ कांदे कापून त्याचा रस काढा आणि केसांना लावा. यामुळे केस काळे होतील आणि केसगळती थांबेल. मात्र हा उपाय नियमित करणे आवश्यक आहे.

**चहा पावडर :** पांढरे केस काळे करण्यासाठी चहाची पावडर फायदेशीर ठरते. चहा पावडर चांगल्या प्रकारे उकळवून घ्या आणि या पाण्याने केस धुवा. याचा परिणाम हळूहळू दिसू लागेल.

**आवळा :** आवळ्याचे छोटे छोटे तुकडे करुन तेलात उकळवा. आवळ्याचा रंग काळा झाल्या नंतर या तेलाने केसांना मालिश करा. याशिवाय आवळ्याच्या पेस्टमध्ये लिंबाचे काही थेंब घाला.

**कोरफड :** केसांचे आरोग्य उत्तम राखण्यासाठी कोरफड फायदेशीर ठरते. केस धुण्यापूर्वी कोरफड जेल लावा आणि मसाज करा. त्यानंतर केस धुवा. केस काळे आणि दाट होतील.

# स्मार्टवॉच खरोखरच उपयुक्त की खिशाला कात्री ?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

डिजिटल युगात स्मार्टवॉच हे केवळ वेळ पाहण्याचे साधन न राहता फिटनेस आणि कनेक्टिव्हिटीचे मुख्य माध्यम बनले आहे. रक्तातील ऑक्सिजन, हृदयाचे ठोके आणि इमर्जन्सी फॉल डिटेक्ट करणे यांसारख्या तांत्रिक फिचर्समुळे दैनंदिन कामे सोपी होतात. मात्र, वैद्यकीय विज्ञानानुसार याच्या अतिवापरामुळे मानसिक चिंता आणि शारीरिक धोकेही वाढू शकतात. चला तर मग जाणून घेऊया.

अनेक स्मार्टवॉचेस कॅलरी बर्नचे रिडिंग्स १५ ते २५ टक्क्यांपर्यंत चुकीचे दाखवितात. केवळ एका गॅझेटवर आरोग्याचे गणित अवलंबून ठेवणे चुकीचे आहे. तंत्रज्ञानाचा हा तांत्रिक मर्यादांचा अभ्यास युझर्सचा स्क्रीन टाईम आणि डिजिटल व्यसन कमी करण्यासाठी सजग राहण्याचा इशारा देतो.

स्मार्टवॉचचे मुख्य फायदे आणि सोपी होणारी कामे

स्मार्टवॉचमध्ये बसवलेले ऑप्टिकल सेन्सर्स आणि बायो-इलेक्ट्रॉनिक सिस्टीम आपल्या दैनंदिन जीवनातील अनेक कामे अत्यंत सुलभ करतात.

**२४ तास आरोग्यावर नजर :** स्मार्टवॉचमधील प्रगत सेन्सर्स रक्तातील ऑक्सिजनची पातळी (एसपी ओ २), २४ तास हृदयाचे ठोके आणि झोपेचा दर्जा मोजतात. ॲपल किंवा सॅमसंगसारख्या प्रीमियम वॉचेसमध्ये ऑन-डिमांड ईसीजी (ईसीजी) काढण्याची सुविधा देखील उपलब्ध आहे.



**मोबाईलशिवाय कनेक्टिव्हिटी :** गाडी चालवताना किंवा महत्त्वाच्या बैठकीत असताना वारंवार मोबाईल खिशातून बाहेर काढण्याची गरज पडत नाही. तुम्ही मनगटावरूनच कॉल रिसिव्ह करू शकता, मेसेजेस वाचू शकता आणि क्विक रिप्लाय देऊ शकता.

**अचूक नेव्हिगेशन आणि जीपीएस :** अनोळखी रस्त्यांवरून प्रवास करताना किंवा ट्रेकिंगला गेल्यावर इन-बिल्ट जीपीएसमुळे थेट घड्याळाच्या स्क्रीनवर नकाशे आणि दिशा दिसतात.

**फॉल डिटेक्शन आणि सुरक्षितता (एसओएस) :** हे फीचर ज्येष्ठ नागरिकांसाठी वरदान ठरले आहे. घड्याळ घातलेली व्यक्ती अचानक खाली पडल्यास, वॉच आतील गायरोस्कोप सेन्सरच्या मदतीने ते ओळखून आपोआप इमर्जन्सी कॉन्टॅक्ट्सना अचूक लोकेशनसह अलर्ट पाठवते.

**वैयक्तिक फिटनेस ट्रेनर :** तुम्ही दिवसभरात किती पावले चाललात (स्टेप काऊंटर), किती कॅलरी बर्न केल्या आणि चालण्याचा वेग किती होता, याचा संपूर्ण तांत्रिक डेटा हे गॅझेट साठवून ठेवते.

**स्मार्टवॉचचे छुपे तोटे**

**कॅलरी बर्नच्या अहवालात त्रुटी :** पीएलओएस वन जर्नल (२०२६) मधील ताज्या वैज्ञानिक संशोधनानुसार बहुतांश स्मार्टवॉचेस हे कॅलरी बर्नचे अचूक मोजमाप करू शकत नाहीत. सरासरी वॉचेसमध्ये १५ टक्के ते २५ टक्क्यांपर्यंत त्रुटी आढळते. त्यामुळे वजन नियंत्रणासाठी याच्या रिडिंग्सवर पूर्णपणे अवलंबून राहणे चुकीचे आहे.

**वैद्यकीय उपकरणांचा पर्याय नाही :** स्मार्टवॉच हे वैद्यकीय उपकरण नाही. याच्या आधारे स्वतःच स्वतःवर उपचार करणे किंवा बीपी-शुगरचे रिडिंग्स अंतिम मानणे आरोग्यासाठी धोकादायक ठरू शकते.

**'हेल्थ अँझायटी' :** रिपोर्टनुसार मनगटावर सतत धावणारे आकडे (उदा.- ताण पातळी, हार्ट रेट) वारंवार पाहिल्यामुळे युझर्समध्ये मानसिक ताण आणि चिंता वाढण्याचे प्रमाण वाढले आहे.

**रेडिएशनची भीती :** स्मार्टवॉचेस सतत फोनशी ब्लूटूथ किंवा वायफायने कनेक्ट असतात, ज्यामुळे त्यातून 'नॉन-आयोनायझिंग' इलेक्ट्रोमॅग्नेटिक लहरी उत्सर्जित होतात. जरी हे प्रमाण सुरक्षित मर्यादेच्या आत असले, तरी २४ तास त्वचेच्या थेट संपर्कात राहणे काही बाबतीत संवेदनशील युझर्ससाठी त्वचेच्या ॲलर्जीचे कारण बनते.

**चार्जिंगची कटकट आणि स्क्रीन टाईम :** स्मार्टफोनप्रमाणेच स्मार्टवॉचही दररोज किंवा दर २-३ दिवसांनी चार्ज करावी लागते. तसेच सतत येणाऱ्या नोटिफिकेशन्समुळे डिजिटल डिस्ट्रॅक्शन (लक्ष विचलित होणे) वाढते. स्मार्टवॉच हे आरोग्याबाबत सतर्क राहण्यासाठी आणि उत्पादकता वाढवण्यासाठी एक उत्कृष्ट 'सपोर्टिंग टूल' आहे. मात्र विज्ञानाचा नियम लक्षात ठेवून याच्या रिडिंग्सवर आंधळा विश्वास न ठेवता संतुलित वापर करणे हेच ग्राहकांच्या हिताचे आहे.

# रोज सॅलड खाता, पण त्याचा शरीराला फायदा होतो ?



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

वजन कमी करण्यापासून ते पोटाच्या विविध समस्या दूर करण्यापर्यंत आजची पिढी सर्वांत जास्त महत्त्व काकडी, टोमॅटो आणि लेट्यूसच्या पानांना देते. बऱ्याच लोकांना वाटतं की दररोज फक्त एक वाटी कच्चं सॅलड खाल्ल्याने शरीराला सर्व पोषक तत्वं मिळतील. पण डॉक्टर स्वदेश मन्ना यांनी ही कल्पना पूर्णपणे खोडून काढली आहे. त्यांचा स्पष्ट दावा आहे की या सवयीमुळे अधिक फायदा होत नाही. जर तुम्हाला वाटत असेल की दररोज नाश्त्यात किंवा रात्रीच्या जेवणात फक्त एक वाटी सॅलड खाऊन तुम्ही तुमच्या फायबरची दैनंदिन गरज पूर्ण करत आहात, तर तुम्ही खूप मोठी चूक करत आहात.

निरोगी आणि ताजेतवाने शरीरासाठी फायबरयुक्त पदार्थ आवश्यक आहेत. ते आपली पचनसंस्था सक्रिय ठेवते आणि पोट निरोगी ठेवते, बद्धकोष्ठता दूर करते आणि रक्तातील हानिकारक कोलेस्ट्रॉलची पातळी नियंत्रित करण्यासाठी ढाल म्हणून काम करते. यासंदर्भात तज्ज्ञांच्या मते ज्या भाज्यांपासून आपण सहसा सॅलड बनवतो, त्यापैकी बहुतेक भाज्यांमध्ये पाणीच जास्त असते. त्यामध्ये फायबरचे प्रमाण नगण्य असते, ज्याला शास्त्रीय भाषेत 'लो डेन्सिटी फायबर' म्हटले जाते. मात्र, वैद्यकीय शास्त्रानुसार निरोगी राहण्यासाठी एका प्रौढ व्यक्तीला दररोज सरासरी २५ ते ३० ग्रॅम फायबरचे सेवन करणे आवश्यक आहे. तज्ज्ञांच्या म्हणण्यानुसार जर तुम्हाला केवळ सॅलड खाऊन फायबरची ही प्रचंड गरज पूर्ण करायची असेल, तर तुम्हाला दररोज किमान काही किलो कच्च्या भाज्या चावून खाव्या लागतील! जे एखाद्या व्यक्तीसाठी पचवणे किंवा खाणे व्यावहारिकदृष्ट्या अशक्य आहे.

**.. तर शरीराला पुरेसे फायबर कसे मिळू शकते ?**

यावर तज्ज्ञ म्हणतात, की फायबरसाठी तुमच्या आहारात असे काही पदार्थ असायला हवेत, जे कमी प्रमाणात खाल्ले तरी शरीराला योग्य पोषण देऊ शकतील. म्हणजेच, तुम्हाला तुमच्या आहारात 'उच्च घनतेच्या फायबर'ने समृद्ध असलेल्या पदार्थांचा समावेश करणे आवश्यक आहे, ज्यावर सहसा चर्चा होत नाही. फायबरच्या या कमतरतेवर मात करण्याचे मार्ग स्पष्ट करताना तज्ज्ञ म्हणतात, की या कमतरतेवर मात करण्यासाठी, तुम्ही तुमच्या रोजच्या आहारात ओट्स, विविध प्रकारची कडधान्ये, संपूर्ण धान्य आणि फळांच्या सालींचा अधिक समावेश केला पाहिजे. तज्ज्ञ सल्ला देतात, की हे पदार्थ नियमितपणे खाल्ल्याने शरीराची २५ ते ३० ग्रॅम फायबरची दैनंदिन गरज सहज पूर्ण होईल. त्यामुळे आजपासून केवळ सॅलडवर अवलंबून राहण्याऐवजी आहारात हा आवश्यक बदल करणे खूप महत्त्वाचे आहे. पण आहारात कोणतीही बदल करण्यापूर्वी तज्ज्ञांचा सल्ला नक्की घ्या.

# भूलोकीची स्वरकिन्नरी...!

खरंतर भोवतालच्या सर्वस्वी भ्रष्ट, विकृत व तणावग्रस्त वातावरणात तुम्हा-आम्हा सर्वांना जगण्याचं बळ देतं ते या 'भूलोकीच्या स्वरकिन्नरीचा अमृतस्वर!' नाव पुसली जातील, चेहरे बदलतील, पण हा स्वर्गीय स्वर चिरकाल अविनाशी राहील. रसिकांच्या येणाऱ्या पिढ्यान् पिढ्यांना जगण्यासाठी संजीवनी देत राहील.

पाऱ्यासारखा मुक्तपणे फिरणारा मुलायम, गंगाजळासारखा पवित्र, अद्‌भुत खर्जयुक्त, भरदार, कसदार व मंत्रमुग्ध करणारा, ईश्वरासमीप नेणारा, काळजाचा ठाव घेणारा, भावविभोर स्वर लाभलेली, परमेश्वराची अत्यंत स्वरमयी आणि लोभस निर्मिती म्हणजे 'आशाताई भोसले!' आम्हा रसिकांचे अहोभाग्य की आशाताईंसारखं 'स्वररत्न' या भारतभूमीवर अवतरलं! आज मंगळवार, दि. ८ सप्टेंबर अर्थात आशाताईंचा ९३ वा वाढदिवस! यानिमित्त...

पुराणांमध्ये एकाच सरस्वतीचा उल्लेख आहे. भारताची पवित्र भूमी मात्र गेली अनेक दशके दोन सरस्वतींचे सुश्राव्य गायन ऐकत आलीय, त्या म्हणजे, 'लतादीदी मंगेशकर व आशाताई भोसले!'

आशाताईंवर अधिक काय लिहावे, असा प्रश्न पडावा इतकं या जादूई स्वरावर लिहून आलंय. आजही अनेक पिढ्या त्यांच्या गाण्याच्या साक्षीने उसासे टाकताना दिसतात! या लेखाच्या माध्यमातून त्यांच्या अष्टपैलू जीवनाचा मागोवा घेण्याचा अल्पसा प्रयत्न!

रसिकहो, अवघा महाराष्ट्रच नव्हे; तर संपूर्ण देश दोन भोसलेंना सतत नम्रपणे वंदन करत आलाय. एक म्हणजे आपणा सर्वांचे दैवत 'छत्रपती शिवाजीराजे भोसले' व दुसऱ्या, संगीतातील दैवत 'आशाताई भोसले!'

'चुनरिया (१९४८)' तील 'सावन आया रे' या गीताने (संगीतकार हंसराज बहल) सुरू झालेल्या सुरेल प्रवासातील पुढच्याच वळणावर आशाताईंना संगीतकार ओ.पी. नय्यर भेटले आणि सुरवंटाचे पाखरू झाले. स्वतःच्या अष्टपैलूत्वाची खरी ओळख रसिकांना व खुद्द आशाताईंना ओ.पीं. कडेच झाली. म्हणून त्यांच्या संगीत कारकिर्दीत ओ.पीं.चे स्थान अनन्यसाधारण आहे. ओ.पी. व आर. डी. बर्मन यांचे संगीत वजा करून त्यांच्या गायकीवर बोलणं किंवा लिहिणं केवळ अशक्य आहे. तसेच इतर संगीतकारांना उणे न करता त्यांचे योगदान आशाताईंच्या यशात अत्यंत मोलाचे आहे.

ओ.पी. नय्यर यांनी आशाताईंच्या गायकीला पैलू पाडले. त्यावर कळस चढवला आर.डी. ऊर्फ पंचम यांनी! 'आजा आजा मैं हूँ प्यार तेरा' म्हणत आर.डी. त्यांच्या जीवनात आले. या दोघांनी रसिकांना फक्त वेड लावायचे बाकी ठेवले होते. आर.डीं.च्या गाण्यांनी एक पिढी नादावली होती. त्यांना साथ देण्यात आशाताई इंचभरही कमी पडल्या नाही. त्यांच्या संगीत कारकिर्दीतील अनेक कठीण गाणी त्यांनी पंचमदांकडेच म्हटली आहेत. 'दैया मैं ये कहाँ (कारवां)', 'दम मारो दम (हरे रामा हरे कृष्णा)' ही दोन गाणी वानगीदाखल पुरेशी आहेत. अशीच इतर गाणी 'केवळ अद्‌भुत' या सदरात मोडतात. आर.डीं. कडे आशाताईंची केमिस्ट्री छान जमली होती.



तसेच इतर संगीतकारांनी त्यांच्या आवाजाचा आवाका ओळखून, ते देखील गाणी देत असत.

पंचमदा व आशा भोसले यांच्या डेडली कॉम्बिनेशनची एकत्रित गाण्यांची यादी न संपणारी आहे. आज दोघेही काळाच्या पडद्याआड गेलेत, पण काळ त्यांच्या गाण्यांवर कधीच पडदा पडू देणार नाही, हे नक्की!

आशाताईंचं गाणं म्हणजे स्वरातलं भिजलेपण, सोज्वळपण आणि सादगी, म्हणून ते ते या हृदयाचं, त्या हृदयी पोहोचवणारं आहे! गाणं मग ते कोणत्याही पट्टीतील, भाषेतील आणि कोणतीही भावना प्रतीत करणारं असो, त्याचं सोनं करणारी गायिका म्हणजे आशाताई भोसले!

दिग्गज संगीतकार स्व. अनिल विश्वास म्हणायचे, की "लता, संगीताचा आत्मा आहे तर आशा शरीर आहे!" आशाताईंची गाणी ऐकली की कान या इंद्रियाचे अस्तित्व सार्थकी लागलंय असं वाटतं. त्यांच्या आवाजात फिरक आहे, वजन आहे! गीत, कव्वाली, ठुमरी, लोकगीत, भजन, नाट्यसंगीत वा क्लब साँग, ही सर्व प्रकारची गाणी त्या गायल्यात. भजन गाताना त्यांचा आवाज उच्चकुलीन व शालीन स्त्रीचा वाटतो, प्रेमगीत गाताना लाडीक, मुजरा म्हणताना बाजारू रूप धारण करतो, तसेच, 'ये है रेशमी व रात अकेली है' गाताना तो मादक असतो आणि दर्दभरी गाणी गाताना रसिकांच्या काळजाला हेलावून टाकतो. इतकं वैविध्य आशाताईंच्या आवाजात होतं! हे अष्टपैलूत्व अचंबित करणारं आहे. 'उमराव जान'ची गाणी ऐकल्यावर प्रसिद्ध चित्रपट निर्माते-दिग्दर्शक कमाल अमरोही म्हणाले होते, "आशा तुम अच्छा गाती हो, मुझे मालूम नही था!" हे ऐकून आशा आधी आश्चर्यचकित आणि मग कमालीची दुःखी झाली होती. आपण चांगलं गातो, हे कळायला इतकी वर्षं लागली? मग 'उमराव जान' आलाच नसता तर? असे अनेक घाव काळजावर सोसून त्या खंबीरपणे उभ्या होत्या. आपल्या नशिल्या आवाजाने रसिकांवर गारुड करीत राहिल्या. आशाताई तुम्हाला साक्षात दंडवत!

आशाताईंची मराठी गाणी हा स्वतंत्र विषय आहे. मराठीतील त्यांची कामगिरी देखील अविस्मरणीय आहे. हिंदीत त्यांचे सूर ओ.पी. व पंचमदांच्या संगीतासोबत जुळले, त्याचप्रमाणे मराठीत विशेषतः सुधीर फडके, हृदयनाथ मंगेशकर आणि इतर सर्व प्रथितयश संगीतकारांकडे असंख्य गाणी गाऊन अजरामर केलीत. तसेच नव्या पिढीतील गायक असो वा संगीतकार, त्यांच्यासोबत काम करताना आशाताईंना मुळीच अडचण आली नाही! आशाताई पारितोषिकांसाठी कधीच गायल्या नाही. पण या बंडखोर स्वरांच्या धनीच्या पोतडीत, अनेक राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय व मानाचे पुरस्कार, आपण अत्यंत योग्य व्यक्तीच्या हातात गेल्याच्या समाधानाने तृप्त आहेत!

या शतकातला प्रार्थनाय सूर म्हणजे 'आशाताई भोसले!' रसिकांना संमोहित करण्याची ताकद या आवाजात कायम होती. स्वररचनेचे आकार बदलले, रुची बदलली, पण त्यांचा आवाज, बदलत गेलेल्या प्रत्येक वळणावर अनोखं रूप घेऊन आपल्यासमोर आलाय! हसता-हसता गाणं आणि गाता-गाता हसणे, हे त्या सहजरीत्या करीत असत. आशाताईंनी, २० भाषांमध्ये सुमारे बारा हजारांहून अधिक गाणी गाऊन उच्चांक केला आहे. 'माईक हाच माझा परमेश्वर आणि गाणं हीच माझी पूजा आहे,' असं त्या म्हणायच्या.

रसिकहो, मरगळ झटकणारा, परस्परांतला अबोला पुसून टाकणारा, आपल्यासारख्या रसिकांची संगीतसंस्कृती आकाराला आणणारा सुरांचा चैतन्यदायी झंझावात म्हणजे 'आशाताई!' त्या विनम्रपणे म्हणायच्या, 'आजही माझी जुनी गाणी ऐकताना, अजून छान गाता आलं असतं, असं वाटतं!' 'दुसरी लतादीदी मंगेशकर निर्माण होणे, जसं अशक्य आहे, तसेच चतुरस्त्र गायकीने लाखो रसिकांना रिझवणारी दुसरी आशाताई भोसले निर्माण होणे तरी कुठे शक्य आहे? अशा या महान आत्म्याला आम्हा संगीत रसिकांच्या वतीने 'कुर्निसात ' करतो.

**– शरद सोनवणे, अमळनेर.**
**मो. : ९४२०१ ०८३०५**




# आज श्रावण भौम प्रदोष व्रत : द्रारिद्र्य, कर्जमुक्तीची सुवर्णसंधी!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

श्रावण महिना संपत आला. या महिन्यात आपण शक्य तेवढी शिव उपासना केली, यातच अधिक शिवकृपेची संधी मिळत आहे मंगळवार, दि. ८ सप्टेंबर २०२६ रोजी. कारण या दिवशी आहे भौम प्रदोष. शिव कृपेसाठी फलदायी मानले जाणारे प्रदोष व्रत दर महिन्यात दोनदा येते. मात्र, सध्या श्रावण मास अर्थात भगवान शिव यांचा महिना सुरू आहे आणि त्यात मिळालेली ही प्रदोष व्रताची संधी आपल्यासाठी पर्वणी ठरणार आहे. हे व्रत मंगळवारी आल्यामुळे ते भौम प्रदोष व्रत म्हटले जाईल. या दिवशी साध्या-सोप्या शिव उपासनेने भगवान शिव यांची कृपा कशी प्राप्त करता येईल ते जाणून घेऊ.

आपण आपल्या घरात, शाळेत, महाविद्यालयात, ऑफिसमध्ये जसे ठराविक नियम पाळतो, तसे मंदिराचेही काही नियम पाळणे बंधनकारक असते. मग ते नियम देवपूजेशी संबंधित असो नाहीतर आपल्या पेहरावाशी! या नियमांचा संबंध मंदिराच्या पवित्र वातावरणाशी असतो. म्हणून शक्य तेवढ्या प्रमाणात नियमांचे पालन करून देवपूजा करावी असे धर्म शास्त्र सांगते. मंगळवार, दि. ८ सप्टेंबर २०२६ रोजी भौम प्रदोष आहे. कर्जमुक्ती आणि आर्थिक लाभासाठी हे व्रत केले जाते. हे व्रत सायंकाळी ६.४५ ते ७.१५ या कालावधीत करावे.



### काय आहेत व्रतविधी आणि नियम?

**अभिषेकाचे पाणी घरून न्यावे :** भगवान शिव यांच्या अभिषेकाची परंपरा फार जुनी आहे. शिवपिंडीवरील कलशातून शिवाच्या डोक्यावर संतत धार पडावी या हेतूने कलशाची रचना केली जाते. त्यानुसार आपणही शिवाभिषेक करताना भगवान शंकरांच्या पिंडीवर थोडे पाणी घालून उर्वरित पाणी वरील कलशात घालावे. मात्र ते पाणी घरून नेलेले असावे. शिवपूजेला जाताना फुले, दूध आणि पाणी घरातून घेऊन जाण्याचा प्रघात आहे. एकवेळ फुले आणि बेल मंदिराबाहेरील फूल विक्रेत्याकडे मिळेलही; परंतु दूध किंवा नुसते पाणी घरूनच घेऊन जावे, असे शास्त्र सांगते. तसे करणे हे भगवंताशी जिव्हाळ्याचे नाते जोडण्यासारखे आहे. देवासाठी आठवणीने कलशातून किंवा पेल्यातून नेलेले पाणी आपला सच्चा भाव दर्शवते.

**पाण्याचा पेला रिकामा परत आणू नये :** दुधामुळे शिवालयातील गाभाऱ्यात वास येतो. म्हणून शास्त्रापुरते थेंबभर दूध आणि बाकीचा अभिषेक पाण्याने करावा. अभिषेकासाठी नेलेले भांडे, फुलपात्र किंवा कलश घरातून नेताना जसा पाण्याने भरून नेतो, तसा मंदिरातून परतताना तो भरून आणावा. मंदिरातून थोडेसे पाणी घरी घेऊन यावे आणि ते तीर्थ समजून घराच्या कानाकोपऱ्यात शिंपडावे. त्यामुळे घरातील नकारात्मक लहरी दूर होतात आणि सकारात्मक ऊर्जेचा संचार होतो.

मंदिरात जाण्याचे कपडे मंदिरात जाताना आपला वेष सात्त्विक असावा. तोकडे कपडे घालून मंदिरात जाऊ नये. मंदिराचे पावित्र्य भंग करू नये. ज्याप्रमाणे शाळेत, कॉलेजमध्ये आपण गणवेश घालतो तसा धार्मिक स्थळी जाताना नीटनेटके, स्वच्छ धुतलेले कपडे हा गणवेश समजावा. जर सोवळे नेसले असेल तर ते वस्त्र नेसून झोपू नये. ते कपडे बदलावेत आणि साध्या कपड्यांवर इतर दैनंदिन कामे करावीत.

**निर्माल्य :** मंदिराचे वातावरण पवित्र ठेवण्यासाठी तिथली स्वच्छता जपण्याची जबाबदारी भाविक म्हणून आपली असते, हे ध्यानात ठेवले पाहिजे. मंदिराबाहेर आपली पादत्राणे अस्ताव्यस्त टाकू नयेत. चिखलाचे पाय धुवून मगच मंदिरात प्रवेश करावा. पूजेचे निर्माल्य झाडाच्या बुंध्याशी न टाकता निर्माल्य कुंडीतच टाकावे. निर्माल्याचा कुबट वास येत असल्यास मंदिराच्या व्यवस्थापकांच्या कानावर घालावे.

भगवान शिव यांची पूजा ही केवळ शिवलिंगाची पूजा नाही, तर शिवालयाचे आवार स्वच्छ ठेवणे ही देखील शिवपूजा आहे. हे ध्यानात ठेवावे आणि आपल्या धार्मिक स्थळांचे पावित्र्य जपावे. दिलेले नियम पाळले असता भौम प्रदोष व्रताचे सकारात्मक परिणाम अनुभवास येतात.



संत सेना महाराज पुण्यतिथी विशेष

# सेवेतून साधनेचा आणि भक्तीतून समतेचा संदेश

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

संत परंपरेतील तेजस्वी संत म्हणून संत सेना महाराज यांचे कार्य आणि विचार आजही समाजाला प्रेरणा देतात. व्यवसायाने नाभिक असतानाही त्यांनी आपल्या दैनंदिन कर्मालाच ईश्वरसेवेचे स्वरूप दिले. कर्म हेच साधन आणि भक्ती हाच जीवनाचा आधार मानून त्यांनी सामान्य जनतेला आध्यात्मिकतेचा सहज आणि सोपा मार्ग दाखविला.

संत सेना महाराजांनी बाह्य आडंबरापेक्षा अंतःकरणातील शुद्धता, नामस्मरण, प्रामाणिक कर्म आणि भगवंतावरील निष्ठेला अधिक महत्त्व दिले. त्यांच्या जीवनातील अनेक प्रसंगांतून 'ईश्वर भक्ताच्या हाकेला धावून येतो' हा दृढ विश्वास अधोरेखित होतो. त्यांच्या अभंगवाणीनेही भक्ती, सदाचार, समता आणि मानवतेचा संदेश समाजापर्यंत पोहोचविला. संत सेना महाराजांचे आध्यात्मिक महत्त्व केवळ भक्तीपरंपरेपुरते मर्यादित नाही. त्यांनी काम कोणतेही असो, ते निष्ठेने आणि प्रामाणिकपणे केले तर तेच ईश्वरसेवा ठरते, हा जीवनमूल्यांचा संदेश दिला. त्यामुळे श्रमाला प्रतिष्ठा, माणसामाणसांत समानता आणि प्रत्येकाच्या कर्मात परमेश्वराचे दर्शन ही त्यांच्या विचारांची मूलभूत शिकवण ठरते.

आजच्या धावपळीच्या आणि तणावपूर्ण जीवनात संत सेना महाराजांचे विचार अधिकच समर्पक वाटतात. नामस्मरण, निष्काम कर्म, नम्रता आणि मानवसेवा या मार्गाने जीवन जगण्याची प्रेरणा त्यांच्या चरित्रातून मिळते. त्यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या कार्याचे स्मरण करणे म्हणजे केवळ एका संताला अभिवादन करणे नव्हे, तर त्यांच्या समता, सेवा आणि भक्तीच्या विचारांचा आपल्या जीवनात स्वीकार करणे होय. संत सेना महाराजांचा संदेश आजही स्पष्ट आहेकर्मात प्रामाणिकपणा, हृदयात भक्ती आणि आचरणात मानवता असेल, तर सामान्य जीवनही परमेश्वराच्या साधनेत रूपांतरित होते.

**संत सेना महाराजांचा अभंग**

*जातां पंढरीसी सुख वाटे जीवा । आनंदें केशवा भेटतांचि ॥१॥*
*या सुखाची उपमा नाहीं त्रिभुवनीं । पाहिली शोधोनी अवघीं तीर्थे ॥२॥*
*ऐसा नामघोष ऐसे पताकांचे भार। ऐसे वैष्णव डिंगर दावा कोठें ॥३॥*
*ऐसी चंद्रभागा ऐसा पुंडलीक। ऐसा वेणुनादी काला दावा ॥४॥*
*ऐसा विटेवरी उभा कटेवरी कर। ऐसे पाहतां निर्धार नाहीं कोठें ॥५॥*
*सेना म्हणे खूण सांगितली संतीं । यापरती विश्रांती न मिळे जीवा ॥६॥*

# श्रीगणेशांची स्थापना करताना 'या' दिशेला करा

## जाणून घ्या वास्तूशास्त्रानुसार योग्य दिशा कोणती?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

दरवर्षी भाद्रपद महिन्यातील शुक्ल पक्षाच्या चतुर्थी तिथीला गणेश चतुर्थीचा उत्सव साजरा केला जातो. यावर्षी गणेश चतुर्थीचा उत्सव सोमवार, दि. १४ सप्टेंबर २०२६ रोजी साजरा केला जाणार आहे. या दिवशी गणपती बाप्पांची स्थापना करून विधीवत पूजा केली जाते. असे म्हणतात, की यामुळे सौभाग्यात चांगली वृद्धी होते.



### गणेश चतुर्थी पूजेचा शुभ मुहूर्त

हिंदू पंचांगानुसार शुक्ल पक्ष चतुर्थी तिथी सोमवार, दि. १४ सप्टेंबर रोजी सकाळी ७:०६ वाजता सुरू होईल आणि मंगळवार, दि. १५ सप्टेंबर रोजी सकाळी ७:४४ वाजता संपेल. उदयतिथीनुसार सोमवार, दि. १४ सप्टेंबर हा दिवस गणपती स्थापना आणि पूजेसाठी निश्चित करण्यात आला आहे. गणपती बाप्पांची स्थापना करताना व्रत आणि उपवास ठेवला जातो. गणेश चतुर्थीचा दिवस देशभरात मोठ्या आनंदात आणि उत्साहात साजरा केला जातो. धार्मिक मान्यतेनुसार भगवान श्रीगणेशांची पूजा केल्याने भक्ताच्या मनातील सर्व इच्छा पूर्ण होतात. त्याचबरोबर घरात सुख, समृद्धी आणि शांती नांदते.

### कोणत्या दिशेला बाप्पांची स्थापना करावी?

वास्तूशास्त्रानुसार गणपती बाप्पांच्या मूर्तीला तुम्ही घराच्या ईशान्य कोणाला अर्थात उत्तर-पूर्व दिशेला स्थापित करावी. जर ईशान्य दिशेला रिक्त जागा उपलब्ध नसेल तर गणपती बाप्पांची मूर्ती तुम्ही पूर्व, पश्चिम किंवा उत्तर दिशेला स्थापित करू शकता. गणपती बाप्पांची मूर्ती घरी आणताना 'ही' काळजी घ्या. यंदा गणेशोत्सवाला जर तुम्ही तुमच्या घरी बाप्पांची मूर्ती विराजमान करणार असाल, तर काही गोष्टींची काळजी घेणे गरजेचे आहे.

१) गणपती बाप्पांची मूर्ती घरी आणताना मूर्तीबरोबर गणपतींच्या हातात मोदक आणि गणतीचे वाहन उंदीरमामा असावा. कारण गणपतीबाप्पांना मोदक फार प्रिय आहेत.

२) गणपती बाप्पांची बैठ्या स्थितीतील मूर्ती घरी आणणे सर्वांत शुभ मानले जाते.

मान्यतेनुसार अशी मूर्ती घरात आणल्याने कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीच्या सौभाग्यात चांगली वाढ होते. सर्व कार्यांमध्ये यश मिळते. तसेच घरात सुख-शांती टिकून राहते.



# गडगणपती शिल्पसौंदर्याने नटलेले भुलेश्वर मंदिर

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

गडगणपती शिल्पसौंदर्याने नटलेले हे भुलेश्वराचे मंदिर त्याचे सौंदर्य खुलवते ते त्या मंदिराच्या आत कोरलेल्या शिल्पांनी याच शिल्पांमध्ये एक महत्त्वाचे शिल्प आपले लक्ष वेधून घेते. ते म्हणजे 'स्त्री रूपातील गणपती' या गणपती बाप्पांना 'वैनायकी' असे म्हटले जाते. या 'वैनायकी'बाबत जी माहिती मिळते त्यामध्ये आपल्याला बघायला मिळते की प्रत्येक देवतेची शक्ती ही जर मूर्तीरूपात दाखवायची असेल तर ती मूर्ती ही स्त्रीरूपात दाखवतात. 'विनायकाची' शक्ती म्हणून ती 'वैनायकी' तसेच यामध्ये 'गणेशी' आणि 'लंबोदरी' ही देखील नावे आपल्याला बघायला मिळतात. भुलेश्वर येथे असलेली ही 'वैनायकी' रूपातील गणपतींची मूर्ती आपल्याला प्रदक्षिणा मार्गावर बघायला मिळते. तीन मातृकांच्या या वैनायकीचा समावेश केलेला आपल्याला आढळतो. ही 'वैनायकी' पद्मासनात बसलेली असून सालंकृत आहे. अशा प्रकारची मूर्ती ही वेरूळच्या कैलास लेणी येथे देखील आहे आणि आंबेजोगाई येथील मंदिराच्या कोनाड्यात साडी नेसलेल्या रूपात आहे. या मूर्तीच्या खाली आपल्याला मूषक देखील बघायला मिळतो. अशी ही 'वैनायकी' रूपातील गणेशमूर्ती ही भुलेश्वरला गेल्यावर नक्कीच बघावी.

इ.स १६६० मध्ये सिलोनमध्ये आलेल्या फिलिपा बाल्दीव या डच धर्मोपदेशकाने काढलेले हे गणपतींचे चित्र. त्याला डच इस्ट इंडिया कंपनीने धर्मप्रसाराची परवानगी नाकारली. मग त्याने जाफना भागातील तामिळी हिंदूंच्या चालीरीती अभ्यासल्या. १६७२ मध्ये त्याच्या लेखांचे व चित्रांचे पुस्तक प्रकाशित झाले हे चित्र त्याच पुस्तकातील आहे. या गणपती बाप्पांच्या डोक्यावर चंद्र आहे पण मुक्त केशसम्भारही आहे. दोन्ही दात या चित्रात दाखवले असून हातात पळी, प्लेट, घंटा व काठी दिसते. पायात नृत्यासाठी लागणारे घुंगरू दिसतात तर पुढे नैवेद्य म्हणून एका ताटात भाकरी तर दुसऱ्यात भाजी दिसते आहे. विशेष म्हणजे चित्रातील भाविक हिंदू, मुस्लीम, ख्रिश्चन, पारशी अशा अनेकविध पद्धतींनी गणपतींना नमन करताना दिसतात.

रायगड जिल्ह्यातील गडकिल्ल्यांच्या शिवशाहीतील महत्त्वाच्या किल्ल्यांना 'कसबा संगमेश्वर' हे मध्यवर्ती ऐतिहासिक केंद्र आहे, याच संगमेश्वरमध्ये दगडात कोरीव स्वरूपात सिद्धिदायक गणपती.

छत्रपती संभाजी महाराजांनी वयाच्या १४ व्या वर्षी 'बुधभूषण' नावाचा ग्रंथ लिहिला आहे. त्याच्या प्रारंभीच त्यांनी संभाजी महाराजांनी गणपतींचे वर्णन त्यांच्या 'बुधभूषण' या संस्कृत ग्रंथात केले आहे. त्यांनी गणपती बाप्पांना 'सिद्धिदायक' आणि 'बुद्धिसागर' म्हणून संबोधले आहे. तो असा-

"सिद्धिदायकं बुद्धिसागरं । सकलकलाधिप लेसेहें ॥

**मराठीत अर्थ :** गणपती हे सिद्धी देणारे, बुद्धीचे सागर आणि सर्व कलांचे अधिपती आहे. या श्लोकातून संभाजी महाराजांनी गणपती बाप्पांच्या गुणधर्मांचे वर्णन केले आहे.

# श्रावणातील शेवटचा मंगळवार : महत्त्व आणि वैशिष्ट्ये

हिंदू संस्कृतीत श्रावण महिना हा व्रतवैकल्ये, सण-उत्सव आणि भक्तीचा पवित्र काळ मानला जातो. श्रावणातील प्रत्येक वाराला एक वेगळे आध्यात्मिक महत्त्व आहे. ज्यामध्ये सोमवारासोबतच मंगळवारालाही अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. श्रावण महिन्यातील शेवटचा मंगळवार हा या संपूर्ण महिन्यातील स्त्री-शक्तीच्या आणि सौभाग्याच्या उत्सवाची सांगता मानला जातो.

१) मंगळागौर व्रताची सांगता : श्रावणातील प्रत्येक मंगळवारी नवविवाहित स्त्रिया आपल्या पतीच्या दीर्घायुष्यासाठी आणि अखंड सौभाग्यासाठी मंगळागौरीचे व्रत करतात. लग्नानंतर पहिली पाच वर्षे हे व्रत करण्याची परंपरा आहे. शेवटचा मंगळवार हा या व्रताचा अंतिम दिवस असल्याने, या दिवशी देवी गौरीची (पार्वतीची) विशेष भक्तीभावाने पूजा केली जाते. ज्या स्त्रिया काही कारणास्तव सुरुवातीचे मंगळवार करू शकल्या नाहीत, त्या आवर्जून शेवटच्या मंगळवारी देवीची उपासना करतात.

२) शिव-पार्वतीच्या आशीर्वादाचा योग : मंगळागौर ही अन्नपूर्णा आणि माता पार्वतीचे रूप मानली जाते. श्रावण हा भगवान शिवाचा महिना आहे आणि मंगळवार देवी पार्वतीला समर्पित आहे. त्यामुळे शेवटच्या मंगळवारी शिव-पार्वतीची एकत्रित पूजा केल्याने वैवाहिक जीवनात सुख, समृद्धी आणि पती-पत्नीमधील प्रेम अधिक दृढ होते, अशी श्रद्धा आहे.

३) पारंपरिक खेळ आणि जागरणाचे विशेष पर्व :



श्रावणी मंगळवारी रात्री सुवासिनी महिला एकत्र येऊन झिम्मा, फुगड्या, कोंबडा, आणि लाटणे यांसारखे विविध पारंपरिक खेळ खेळून रात्रभर जागरण करतात. शेवटच्या मंगळवारी या खेळांचा उत्साह द्विगुणित झालेला असतो. आधुनिक काळात धकाधकीच्या जीवनातून महिलांना विरंगुळा मिळवून देणारे आणि स्त्री-शक्तीचा सोहळा साजरा करणारे हे हक्काचे व्यासपीठ ठरते.

४) निसर्ग आणि आरोग्याचे महत्त्व : या दिवशी पूजेमध्ये १६ प्रकारच्या पत्री (पाने) आणि वनस्पती वाहिल्या जातात. यामध्ये बेल, तुळस, आघाडा, आणि मोगरा यांसारख्या औषधी वनस्पतींचा समावेश असतो. पावसाळ्याच्या दिवसांत निसर्गाशी जोडले जाणे आणि या वनस्पतींचे आरोग्यदायी महत्त्व ओळखणे, हाही या पूजेमागील एक मुख्य शास्त्रीय उद्देश आहे.

श्रावणाचा शेवटचा मंगळवार हा केवळ एक धार्मिक सण नसून तो मांगल्याचे, आनंदाचे, आणि स्त्री-सौहार्दाचे प्रतीक आहे. हा दिवस महिलांना एकत्र आणून संस्कृतीची जोपासना करण्याची आणि निसर्गाप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याची सुंदर संधी देतो.

# निम्मा मंगळ थंड, निम्मा उष्ण

## उत्तरपेक्षा दक्षिण ध्रुव आतून २०० ते ४०० अंशांनी अधिक उष्ण

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

लाल ग्रह म्हणून ओळखल्या जाणाऱ्या श्री मंगळग्रहाच्या संदर्भात एक धक्कादायक आणि महत्त्वपूर्ण वैज्ञानिक शोध समोर आला आहे. श्री मंगळग्रहाचा आतील दक्षिण भाग हा त्याच्या उत्तर भागापेक्षा तब्बल २०० ते ४०० अंश सेल्सिअसने अधिक उष्ण असून तो अंशतः वितळलेल्या स्वरूपात असण्याची शक्यता शास्त्रज्ञांनी वर्तविली आहे. 'नेचर' या प्रसिद्ध नियतकालिकात नुकतेच हे संशोधन प्रसिद्ध झाले आहे.

कॅलिफोर्निया इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी आणि ॲरिझोना विद्यापीठाच्या संशोधकांनी 'टायडल टोमोग्राफी' या तंत्राचा वापर करून ग्रहाच्या गुरुत्वाकर्षणातील सूक्ष्म बदलांचा अभ्यास केला. यासाठी नासच्या 'मार्स ग्लोबल सर्व्हेयर', 'मार्स ऑडिसी' आणि 'मार्स रेकॉनिसन्स ऑर्बिटर' या तीन मोहिमांच्या गेल्या काही दशकांतील डेटाचे विश्लेषण करण्यात आले.

### उष्णतेमागील संभाव्य कारणे

१) मंगळाच्या केवळ दक्षिण भागातच ही अतिरिक्त उष्णता का साचली आहे, याचे निश्चित कारण शोधण्याचे काम सुरू आहे. संशोधकांच्या मते भूतकाळात उत्तर भागावर झालेल्या एखाद्या विशाल उल्कापातामुळे तेथील उष्णता बाहेर पडली असावी.

२) दक्षिण भागातील जाड खडकांच्या थरांमुळे तेथील उष्णता बाहेर न पडता आतच कोंडली गेली असावी.

३) मंगळाच्या दक्षिण मॅन्टलमध्ये भूतकाळात घडलेल्या विशिष्ट प्रक्रियांमुळे ही उष्णता निर्माण झाली असावी.

### निष्कर्ष आणि महत्त्व

मंगळाच्या पृष्ठभागावर उत्तर आणि दक्षिण गोलार्धात आधीपासूनच मोठा फरक दिसतो. दक्षिणेकडील भाग उंच पर्वत आणि खड्ड्यांनी भरलेला आहे, तर उत्तरेकडील भागात सपाट मैदाने आहेत. हा फरक केवळ वरवरचा नसून ग्रहाच्या पोटातही प्रचंड तापमान फरकाच्या रूपात अस्तित्वात असल्याचे आता सिद्ध झाले आहे. मंगळाच्या दक्षिण भागातील खडकांमध्ये आढळणारे विचित्र चुंबकीय संकेत आणि नासाच्या इनसाइट मोहिमेदरम्यान दक्षिणेकडे भूकंपाच्या लहरींची ऊर्जा वेगाने कमी होणे, या दोन मोठ्या रहस्यांचे उत्तर या उष्णतेच्या फरकामुळे मिळाले आहे.

### जीवसृष्टीचे संकेत

मंगळाच्या पोटातील या उष्णतेचा ग्रहावरील प्राचीन पाण्याच्या साठ्यांशी आणि नद्या/तलावांच्या निर्मितीशी थेट संबंध असू शकतो. यामुळे भूतकाळात मंगळावर जीवसृष्टीसाठी अनुकूल वातावरण होते का, हे समजण्यास मदत होणार आहे.



(वरील माहिती विविध धर्मग्रंथ, समाजमाध्यमे अर्थात सोशल मीडियावरून संकलीत केली आहे.)